**महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळामार्फत चालविण्यात येणाऱ्या अल्प मुदतीच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क निर्धारीत करण्याबाबत.**

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : व्हीओसी -२०१२/३६५/प्र.क्र.१६९/व्यशि-४,
मंत्रालय विस्तार, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १९ मार्च, २०१३.

संदर्भ : १) प्र.संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक : ५/शांतावि/२०१२/३८, दिनांक १९.०५.२०१२.
२) संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक ५/शांतावि/२०१२/३८, दिनांक २८.०५.२०१२.
३) आयुक्त, कौशल्य विकास, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक : ५/शांतावि/२०१२/३८, दिनांक २०.०६.२०१२.

**प्रस्तावना :** महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळामार्फत २९ गटातील ६ महिने, १ वर्ष व २ वर्ष कालावधीचे अंशकालीन व पूर्णवेळ स्वरुपाचे १०९१ अभ्यासक्रम राबविण्यात येतात. सद्यःस्थितीत ४१५९ मान्यताप्राप्त संस्थांमधुन व्यवसाय प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्यात येत असुन, त्यांची विद्यार्थी प्रवेशक्षमता २३१५९५ इतकी आहे. अल्पमुदतीचे व्यवसाय अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्था ७०% ग्रामीण व ३०% शहरी भागात आहेत. महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ स्थापनेपासून या अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क निश्चित झालेले नसल्याने मान्यताप्राप्त खाजगी संस्था निरनिराळया दराने शिक्षण शुल्क आकारणी करीत आहेत. त्यामूळे मान्यताप्राप्त खाजगी संस्थाकडुन आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्कामध्ये सुसूत्रता नव्हती. त्यामूळे संचालक (व्यवसाय शिक्षण) यांनी, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाच्या अभ्यासक्रमांसाठीच्या प्रस्तावित खर्चाबाबत अभ्यासक्रम, अभ्यासक्रम कालावधी, विद्यार्थी प्रवेशक्षमता, शिक्षकांचे वेतन, अंशकालीन / तासिका तत्वावर शिक्षक, इतर पूरक स्टाफ, कार्यालयीन खर्च, कच्चा माल, इमारत भाडे, हत्यारे/यंत्र सामुग्री, इ. बाबी विचारात घेऊन शासनास शिक्षण शुल्काबाबत प्रस्तावित केले आहे. त्यानुसार याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर केला असता, सदर बाब ही धोरणात्मक असल्यामुळे त्यास शालेय शिक्षण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, आदिवासी विकास विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाची सहमती घेवून मंत्रीमंडळाची मान्यता घेणे आवश्यक असल्याचे सूचित केले आहे. त्यास काही कालावधी लागणार असल्यामुळे शिक्षण शुल्क तातपुरत्या स्वरुपात निर्धारीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** उपरोक्त वस्तुस्थितीच्या आधारे, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या अल्प मुदतीच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क तात्पुरत्या स्वरुपात पुढीलप्रमाणे निर्धारीत करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे. मंडळातील २९ गटातील अभ्यासक्रमांची दोन मुख्य गटांमध्ये १) अ गट व २) ब गटात विभागणी करण्यात आली आहे :-

| अ.क्र. | अभ्यासक्रम गट | कालावधी | प्रकार | शिक्षण शुल्क रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | **अ गट** - संगणक, पॅरामेडीकल, इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, सिव्हिल, ॲग्रिकल्चर, ऑटोमोबाईल, केमिकल, इन्स्ट्रुमेंटेशन, टेक्सटाईल, मुद्रण, चर्मकला, अपारेल, हॉस्पीटॅलिटी, जेम ॲड ज्वेलरी | सहा महिने | पुर्णवेळ | ४८००/- |
| २ | | सहा महिने | अर्धवेळ | २४००/- |
| ३ | | एक वर्ष | पुर्णवेळ | १०१००/- |
| ४ | | एक वर्ष | अर्धवेळ | ५१००/- |
| ५ | | दोन वर्ष | पुर्णवेळ | १०८००/- (प्रती वर्ष) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | **ब गट** - आहार, भाषा, खेळ, सौदर्यशास्त्र, वाणिज्य, | सहा महिने | पुर्णवेळ | ३९००/- |
| ७ | हस्तकला, कला (आर्ट), मास मिडीया, टुरीझम, | सहा महिने | अर्धवेळ | १९००/- |
| ८ | एव्हीएशन, म्युझीक, परफॉर्मीग आर्ट, इतर | एक वर्ष | पुर्णवेळ | ८१००/- |
| ९ | | एक वर्ष | अर्धवेळ | ४०००/- |
| १० | | दोन वर्ष | पुर्णवेळ | ९६००/- (प्रती वर्ष) |

**अटी व शर्ती** :

१) शिक्षण शुल्काची रक्कम अंतिम स्वरुपात निश्चित होईपर्यन्त सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, आदिवासी विकास विभाग व इतर विभागाकडून संस्थांना ई.बी.सी. सवलत/मागासवर्गीयांच्या शुल्काची प्रतिपुर्ती / शिष्यवृत्ती या सवलतींसाठी अनुज्ञेय रहाणार नाहीत.

२) जास्तीच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी संस्थेने वैयक्तिक निधी उभारुन शैक्षणिक सुविधा निर्माण कराव्यात. त्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांकडुन जास्तीचे शुल्क आकारु नये.

३) संस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या इतर सुविधा ना नफा तत्वावर सामाजिक दृष्टया प्रशिक्षणार्थ्यांना पुरविण्यात याव्यात.

४) वरीलप्रमाणे शुल्क ज्या प्रयोजनासाठी आकारण्यात आले आहे, त्याच प्रयोजनासाठी वापरण्यात यावेत.

५) संस्थेने विद्यार्थ्यांकडुन आकारण्यात आलेल्या शिक्षण शुल्काबाबतचा लेखा दरवर्षी संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाच्या नुतनीकरणाच्या प्रस्तावाबरोबर संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

७) सदर शिक्षण शुल्क शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासुन लागु राहील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असुन, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक : २०१३०३१९१८४०३३२०८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सी. के. जाधव )
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) आयुक्त, कौशल्य विकास, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) संचालक, (व्यवसाय शिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१
३) अध्यक्ष/सचिव महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर, औरंगाबाद (संचालनालयामार्फत)
५) सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, (संचालनालयामार्फत)
६) संबंधित सर्व संस्था ( संचालनालयामार्फत )
७) मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
८) मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव
९) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) निवड नस्ती/व्यशि-४

D:\Patki\G.R\shikshan shulk- MSBVE.doc